RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक ६ (३)] मंगळवार, एप्रिल १, २०२५/चैत्र ११, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक २२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.—महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.	पृष्ठे १-२

दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सतिश वाघोले,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १ एप्रिल २०२५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९५० चा २९. **ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४१अअ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ४१अअ मध्ये, पोट-कलम (४) मधील, खंड (अ) मध्ये, उप-खंड (चार) नंतर, पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :— १९५०चा २९.

"(पाच) राज्य शासनाने, कलम ५८ अन्वये सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीमध्ये वार्षिक अंशदानाचे प्रदान करण्यातून सूट दिलेली आहे ;

(सहा) राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून किंवा त्यांच्या उपक्रमांकडून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून, वीज आकार, पाणीपट्टी, नगरपालिका किंवा स्थानिक संस्था कर यांचे प्रदान करण्यातून सवलत किंवा सूट किंवा शिथिलता देण्यात आली आहे, अथवा इतर कोणतीही आर्थिक सवलत किंवा सूट किंवा शिथिलता देण्यात आली आहे ;".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५८ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ५८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "दुर्भिक्ष, अवर्षण, पूर, आग किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यांमुळे ओढवलेल्या आपत्तीच्या निवारणासाठीच केवळ असतील त्या विश्वस्तव्यवस्थांना" या मजकुरानंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"किंवा ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, रुग्णालय (कोणतेही शुश्रूषालय किंवा प्रसूतिगृह यांसह), दवाखाना किंवा कलम ४१अअ मध्ये "वैद्यकीय केंद्र" म्हणून निर्दिष्ट केलेले वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे इतर कोणतेही केंद्र चालवीत असतील, आणि ज्यांचा वार्षिक खर्च, पाच लाख रुपयांपेक्षा किंवा राज्य शासनाकडून, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर मर्यादेपेक्षा अधिक आहे त्या विश्वस्तव्यवस्थांना,".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHENG /2009/35528

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग आठ

वर्ष ११, अंक १३ (३)] मंगळवार, एप्रिल १, २०२५/चैत्र ११, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ३४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Public Trusts (Amendment) Act, 2025 (Mah. Act No. XXII of 2025), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

MAHARASHTRA ACT No. XXII OF 2025.

(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 1st April 2025).

An Act further to amend the Maharashtra Public Trusts Act.

XXIX of 1950. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Public Trusts Act, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Seventy-sixth Year of the Republic of India as follows :–

1. This Act may be called the Maharashtra Public Trusts (Amendment) Act, 2025. Short title.

Amendment of section 41AA of XXIX of 1950.

2. In section 41AA of the Maharashtra Public Trusts Act (hereinafter referred to as "the principal Act"), in sub- section *(4)*, in clause *(a)*, after sub-clause *(iv)*, the following sub-clauses shall be added, namely:- XXIX of 1950.

"*(v)* has been given exemption from payment of annual contribution to the Public Trusts Administration Fund, by the State Government under section 58;

(*vi*) has been given any concession or exemption or relaxation in payment of electricity charges, water charges, municipal or local body taxes or any other monetary concession or exemption or relaxation by the State Government, the Central Government or their undertakings or any local authority ; ".

Amendment of section 58 of XXIX of 1950.

3. In section 58 of the principal Act, in sub-section (2), after the words "exclusively for the purpose of relief of distress caused by scarcity, drought, flood, fire or other natural calamity," the following shall be inserted, namely:–

"or the public trusts which maintains a hospital (including any nursing home or maternity home), dispensary or any other centre for medical relief, referred to as the "medical centre" in section 41AA, and whose annual expenditure exceeds five lakhs of rupees, or such other limit as the State Government may, from time to time, by notification published in the *Official Gazette* specify, ".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.